रास्तभाव /शिधावाटप दुकानांच्या परवान्यावर
वारसाची नोंद करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः साविव्य १०००/९३५/प्र.क्र.७२/२०००/नापु २८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- ७ जून , २०००.

संदर्भ : शासन निर्णय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांकःसाविव्य-१०९१/ २४२४/प्र.क्र.६१७८/नापु २८ ,दिनांक २२ डिसेंबर,१९९७

## शासन निर्णय

रास्तभाव / शिधावाटप दुकानदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसास दुकान मंजूर करण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. त्या कार्यपध्दतीमध्ये निश्चित वारस ठरविणे व त्यास दुकान मंजूर करण्यामध्ये कालापव्यय होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे रास्तभाव/शिधावाटप दुकानाच्या परवानाधारकांनी त्यांच्या इच्छेनुसार वारसाच्या नावाची नोंद त्यांच्या परवान्यावर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. ही नोंद परवाना देण्यास सक्षम प्राधिका-यांनी साक्षांकित करावी.

२. जे दुकानदार या पध्दतीने त्यांच्या परवान्यावर वारसाची नोंद साक्षांकित करुन घेतील त्यांच्या मृत्यूनंतर परवान्यावर नोंद केलेल्या वारसास ते रास्तभाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्याची सक्षम प्राधिका-यांनी कार्यवाही करावी.

मात्र जे दुकानदार त्यांच्या परवान्यावर वारसाची नोंद साक्षांकित करुन घेणार नाहीत त्यांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक २२ डिसेंबर,९७ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( पां. जो. जाधव )
कार्यासन अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर
16 JUN 2000

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त